नेहरू बाल पुस्तकालय

NEHRU
BAL PUSTAKALAYA

# आमच्या नद्यांची कहाणी

(भाग 2)



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. १५५५३९

IRBK-0115539

240

लोकवाङ्मय
१५५३९
२५।९।७७

नेहरू बाल पुस्तकालय—29

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा क्र १५५३९ नों. दि २५।९।७७
वि. लो. वा.

## आपल्या नेहरूंची कहाणी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 FEB 1977

[क्र. मा. प.]

1974 (शके 1895)


© अल्. वलिअप्पा, 1973

मूल्य रु. 1.50

STORIES OF OUR RIVERS-II (*Marathi*)

प्रमुख वितरक
**पॉप्युलर प्रकाशन**
35 – सी ताडदेव रोड, मुंबई 34 डब्ल्यू. बी

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली–16.
मुद्रक : धीरुभाई देसाई, स्टेट्स पीपल प्रेस, जन्मभूमी भवन. घोगा स्ट्रीट, फोर्ट, मुंबई–1





श्रीरंगम देवालय



उत्तर भारतातल्या नद्या आणि दक्षिण भारतातल्या नद्या यांच्यात एक महत्त्वाचा फरक आहे. उत्तरेकडच्या नद्या वर्षाचे बाराही महिने वाहातात. केवळ मोसमी पावसाचेच पाणी त्यांना मिळते असे नाही, तर हिमालयातील बर्फ वितळून होणारे पाणीही त्यांना मिळते.

दक्षिणेतल्या नद्यांना बर्फाचे पाणी मिळत नाही. इकडच्या मोठ्या नद्या नैऋत्य आणि ईशान्य मोसमी वाऱ्यांच्या पावसाने मिळणाऱ्या पाण्याने वाहातात. दक्षिणेकडच्या बहुतेक नद्या पावसाळ्यात व नंतर तुडुंब भरून वाहात असतात, पण उन्हाळा जसजसा जवळ येतो, तसतशा त्या सुकत जातात आणि त्यांना अगदी किरकोळ ओढ्या-नाल्यांचे स्वरूप येते. दक्षिणेकडील लहान लहान नद्यांच्या पात्रांतील वाळवंटांत तर उन्हाळ्यात मुले चक्क खेळताना दिसतात.


पण एवढा फरक सोडला, तर लोकांच्या दैनंदिन जीवनक्रमात उत्तरेकडच्या आणि दक्षिणेकडच्या नद्या सारखीच कामगिरी बजावतात. उत्तरेकडच्या नद्यांपेक्षा दक्षिणेकडच्या नद्या काही वेगळ्या नाहीत. त्यांच्याहीबद्दल नाना कथा सांगितल्या जातात, त्यांची पूजा केली जाते आणि गीतांतून त्यांना आळवले जाते. अन्तर्गत जलमार्ग म्हणून माल वाहतुकीसाठी त्यांचा उपयोग होतो. शेती आणि वीजनिर्मितीसाठी त्यांचे पाणी साठवण्याकरता स्थापत्यशास्त्रज्ञांनी त्यांच्यावर धरणे बांधली आहेत.

भारतातली बहुसंख्य जनता शेतीत किंवा शेतीशी संबंधित असलेला व्यापार वा उद्योग यात गुंतलेली आहे. शेतीसाठी आपल्याला भरपूर पाण्याची

आवश्यकता भासते. त्यामुळे कोट्यवधी लोकांचे जीवन नद्यांवर अवलंबून आहे.

तेव्हा नदी – मग ती वर्फाच्छादित हिमालयातून उगम पावलेली असो, किंवा मोसमी पावसाने भिजलेल्या दक्षिणेकडल्या एखाद्या डोंगरातून निघालेली असो, तिचे आपल्या जीवनातील स्थान अमोल आहे. आपल्याच कशाला? फार पूर्वीपासून जगभर सर्वत्र माणूस सदैव नदीवरच अवलंबून राहात आला आहे. ती त्याच्या अनेक प्रकारे उपयोगी पडली आहे.

प्राचीन काळी नदी लोकांचे हल्लेखोरांपासून रक्षण करी. आजदेखील एखाद्या राज्याची वा प्रदेशाची सीमा सहसा नदीच असते. आर्य, इजिप्शिअन, वाबिलोनियन, असीरियन– या प्राचीन संकृती नद्यांच्या काठीच उदयास आल्या.




# कावेरी

कावेरी नदी म्हैसूर आणि तामिळनाडू या राज्यांतून वाहाते. म्हैसूर राज्यात समुद्रसपाटीपासून 1320 मीटर उंचीवर असलेल्या ब्रह्मगिरी डोंगरात ती उगम पावते. हा डोंगर पश्चिम घाटाचाच एक भाग असून तो त्या भागात कूर्ग या नावाने ओळखला जातो. कूर्ग हा म्हैसूर राज्यातील रमणीय डोंगराळ भाग आहे. कूर्ग भागातील माणसे रजपूतांसारखीच कणखर, निर्भय आणि लढाऊ वृत्तीची आहेत.

नदीचा जन्म ही बाळाच्या जन्मासारखीच आनंददायक घटना. ती थाटात साजरी झालीच पाहिजे, नाही का ? तेव्हा दरवर्षी संक्रान्तीच्या दिवशी लोक ब्रह्मगिरीवर जातात आणि कावेरीची उगमाची धार एका लहानशा टाक्यात पडताना तिचे दर्शन घेतात. पूर्वी या उगमापर्यंत जायला रस्ता नव्हता. उगमापासून पाच किलोमीटर्सवरच रस्ता संपला होता. तिथून उगमापर्यंत दाट जंगल होते. त्यांत वन्य श्वापदे फिरत. तरीही कावेरीची जन्मवेळ साजरी करायला दरवर्षी ऑक्टोबरमध्ये लोक तिथपर्यंत जात. अर्थात उगमाचे दर्शन हे तिथले मुख्य आकर्षण असते हे खरे. पण तिथे जाताना मार्गावरून दुतर्फा घडणारे देहभान हरपवून टाकणारे देखणे निसर्गदर्शनही तितकेच आकर्षक असते.


डोंगर चढताना एका विशिष्ट ठिकाणी एक पाषाण आहे. त्यावर उभे राहिले असता डोंगराचा माथा दिसतो. असे सांगतात की, अठराव्या शतकातला

म्हैसूरचा एक राज्यकर्ता टिपू सुलतान कूर्गवरील हल्ल्यावरून परत येत असताना वाटेत येथे विश्रांतीसाठी थांबला होता. एका खडकावर उभे राहून



त्याने डोंगराकडे पाहिले आणि डोंगरमाथ्याजवळून उसळणाऱ्या जलप्रवाहाचे सुंदर दृश्य त्याला पहायला मिळाले. ते पाहून तो इतका भारावून गेला, की

पश्चिम घाट



त्याने डोंगराकडे पाहिले आणि डोंगरमाथ्याजवळून उसळणाऱ्या जलप्रवाहाचे सुंदर दृश्य त्याला पहायला मिळाले. ते पाहून तो इतका भारावून गेला, की

पश्चिम घाट



नदीच्या त्या डौलदार रूपापुढे त्याचे मस्तक आपोआप झुकले. तेव्हापासून हा खडक 'अभिवादन पाषाण' म्हणून ओळखला जातो.


कावेरीच्या उगमाचे पाणी लहान टाक्यात पडताना पाहून लोक आनंदाने वेडे होतात आणि जवळच असलेल्या दुसऱ्या मोठ्या टाक्याकडे धाव घेतात. लहान टाक्यातून या टाक्यात पाणी येत असते. या मोठ्या टाक्यात तीनदा बुड्या मारून लोक स्नान करतात. उगमाचे पाणी असणाऱ्या लहान टाक्यात कोणीही आंघोळ करीत नाही. मोठ्या टाक्यात स्नान करून झाल्यावर लोक लहान टाक्याजवळ येतात आणि त्यातले थोडेसे पाणी हातावर घेऊन ते डोक्यावर शिंपडतात. स्नानाइतकेच हे पुण्यकारक मानले जाते. काही जण वांबूच्या नळ्यांतून येथले थोडे पाणी वरोबर घेऊन जातात. गंगेच्या पाण्याप्रमाण कावेरीचे पाणीही अनेक दिवस चांगले राहाते. सतत वाहाणाऱ्या आणि घाण व कचरा साठून पाणी दूषित होण्यास वाव न देणाऱ्या सर्वच नद्यांच्या वावतीत हे सामान्यत: खरे असते.

म्हैसूर आणि तामिळनाडूमधील अनेक मुलींना कावेरी नदीचे नाव दिले जाते, यात नवल नाही. या नदीच्या प्रत्येक वळणाची आणि तिच्या तीरावरील प्रत्येक मंदिराची कथा आहे. त्यातली एक अगस्ती ऋषी आणि कावेरी नदीचा जन्म यावद्दलची आहे.

असे सांगतात की, कावेरन नावाच्या एका राजास मूलवाळ नव्हते. तेव्हा ब्रह्मदेवाने कावेरी ही सुंदर मुलगी त्याला दिली. पुढे अगस्ती ऋषी तिच्या प्रेमात पडले आणि तिच्याशी लग्न करायची त्यांना इच्छा झाली. कावेरीच्या वडलांनी एका अटीवर यास मान्यता दिली. ती अशी की, अगस्तींनी कधीही आपल्या पत्नीस एकटे सोडता कामा नये. अगस्तींनी तसे वचन दिले. लग्न झाले आणि ते जोडपे आनंदाने एका आश्रमात राहू लागले. अगस्ती ऋषींनी आपले वचन बरेच दिवस पाळले. पण एक दिवस त्यांनी आपल्या शिष्यांना तत्त्वज्ञानातला एक अवघड धडा शिकवायला सुरुवात केली. तो शिकवण्यात ते इतके



रंगून गेले की, धडा संपेचना. त्यामुळे ते नेहमीच्या वेळी घरी परत आले नाहीत. कावेरी त्यांची वाट पहात होती. ते परत आले नाहीत, तसे तिला वाटले की, त्यांना काहीतरी अपघात झाला असावा. त्यांच्याशिवाय जगण्याची तिची इच्छा नव्हती. त्यामुळे तिने जीव द्यायचे ठरवले. कोणीही तिला अडवण्यापूर्वीच, तिचा पती ज्या तलावात स्नान करी त्यात तिने उडी घेतली. पण ती मेली नाही. ती तळापर्यंत गेली आणि जमिनीत अदृश्य झाली. ती नदी बनली आणि हळूहळू ब्रह्मगिरीच्या माथ्यापर्यंत जाऊन तिथे प्रगट होऊन ती वाहू लागली. इकडे तिला शोधण्यासाठी अगस्ती ऋषींनी आकाशपाताळ पालथे घातले होते. एक दिवस ते ब्रह्मगिरीच्या माथ्यावर गेले असता, नदीच्या रूपातील आपली पत्नी त्यांनी ओळखली. घरी परत येण्यासाठी त्यांनी तिच्या खूप विनवण्या केल्या. शेवटी कावेरीने परत येण्याचे मान्य केले, पण फक्त स्वतःच्या अर्ध्या रूपात. ती म्हणाली, 'यापुढे माझा अर्धा भाग तुमची पत्नी



म्हणून तुमच्या आश्रमात राहील आणि अर्धा भाग कावेरी नदी बनून धरणीमातेची सेवा करील. तिला समृद्ध करील." कूर्गच्या लोकांना तिने आश्वासन दिले होते की, जिथे मी नदीच्या रूपाने प्रकट झाले तिथे मी दरवर्षी तुम्हाला दर्शन देत जाईन. ते वचन ती दरवर्षी निष्ठेने पाळते, असे लोक मानतात.

नदी म्हणजे काही पाण्याचा नुसता ओघ नव्हे. ती एक चैतन्यशाली, जिवंत शक्ती आहे. नदी म्हणजे दृश्य व अदृश्य जीवन. ती नवे जीवन निर्माण करू शकते आणि उध्वस्तही करू शकते. नदी ज्या जमिनीतून वाहाते त्या जमिनीप्रमाणे तिचा रंग बदलतो, तिचा आकार वेळोवेळी बदलत जातो, एवढेच काय, पण वेगळ्या ठिकाणी तिच्या पाण्याच्या चवीतही फरक पडतो. प्रत्येक नदीचे स्वतःचे असे वैशिष्टय असते. नदीच्या लहरींवर कवी कविता लिहितात; पूल आणि धरणे बांधण्यापूर्वी स्थापत्यशास्त्रज्ञ त्यांचा अभ्यास करतात, आणि नावाडी व शेतकरी त्यांच्याविषयी सदैव सावध असतात.

कावेरीलाही स्वतःचे असे वैशिष्टय आहे. आणि तिच्या 765 किलोमीटर्स लांबीभर ते एकसारखे नाही. एका ठिकाणी ती 'अखण्ड कावेरी' आहे. अनेक उपनद्या मिळून प्रचंड झालेली कावेरी येथे दिसते. तामिळनाडूत प्रवेश करण्यापूर्वी ती मेघताडू किंवा अडु थाण्डुम कावेरी म्हणजे मेंढीला उडी मारून पार करता येईल अशी कावेरी बनते. म्हैसूरच्या वृन्दावन गार्डन्समध्ये पायऱ्यांवर खळखळत उतरणाऱ्या पाण्याचे मुलायम रूप ती घेते, आणि शिवसमुद्रम धबधब्यापाशी डोंगरावरून रोंरावत पायथ्याशी असंख्य इन्द्रधनुष्ये उधळीत उडी घेणारे देखणे पण राक्षसी रूप ती घेते. श्रीरंगमला ती पवित्र तीर्थ बनते, तर श्रीरंगपट्टणला पक्ष्यांसाठी घर निर्माण करणारी कावेरी बनते. ही नदी वर्षातून कधी कधी इतकी सौम्य असते की मुलेबाळेसुद्धा तिच्यात बेधडक पोहतात, पण कधी कधी ती आपले काठ ओलांडून शेतांतून सैरावैरा धावू

लागते, आणि वाटेत येईल ते उध्वस्त करीत जाते.

कावेरी एकच नदी नाही. सगळ्या मोठ्या नद्यांप्रमाणे तीदेखील अनेक छोट्या छोट्या नद्या मिळून बनली आहे. कावेरीपूमपट्टिनम जवळ ती बंगालच्या उपसागरास मिळते, तेव्हा ती अगदी रोडावलेली दिसते. ही कावेरी आहे वृद्ध झालेली, लांबचा प्रवास करून दमलेली आणि सगळ्या जलाशयांचा पिता असलेल्या सागराच्या कुशीत विश्रांती घेण्यास सिद्ध झालेली कावेरी. ब्रह्मगिरीच्या माथ्यावरून दृष्टी फेकली की अरबी समुद्र दिसतो. अरबी समुद्राच्या आसमंतात जन्मलेली ही नदी अनेक लांब, सुंदर वळणे घेत, भारतीय द्वीपकल्पाच्या उत्तरेस असणाऱ्या महासागरास जाऊन मिळते.

कावेरी ब्रह्मगिरीवरून खाली उतरून सखल प्रदेशात येताच कनका आणि गाजोरी या दोन लहान नद्या तिला येऊन मिळतात या तीन नद्यांच्या संगमावर बहामण्डलम हे गाव वसले आहे. उत्तरेकडच्या प्रयागसारखेच ते दक्षिणेत प्रसिद्ध आहे. पण येथे अजून कावेरी लहान नदीच असते. तिने कूर्ग सोडल्यावर आणि हेमावती व लक्ष्मणतीर्थम या दोन नद्या तिला येऊन मिळाल्यावर मात्र ती रुंद आणि खोल अशी मोठी नदी बनते.

एकट्या कर्नाटक राज्यातच कावेरीवर जी डझनभर धरणे बांधण्यात आली आहेत, त्यातले पहिले कन्नमवाडी धरण येथे आहे. वर्षभर शेतीला पाणी पुरवठा व्हावा म्हणून ही धरणे बांधलेली आहेत.

नद्यांवर धरणे बांधण्याचे ज्ञान माणसाला नव्हते तेव्हा, उन्हाळ्यात शेतजमीन कोरडी होई, पिके कोमेजून माना टाकीत आणि जमिनीत ओल नसल्याने पेरलेले बी उगवू शकत नसे. पण नद्यांचे पाणी साठवण्यासाठी धरणे बांधल्याने शेतकऱ्यांना पाहिजे तेव्हा पाणी मिळू शकते आणि त्यामुळे त्यांना वर्षातून दोन किंवा तीनसुद्धा पिके घेणे शक्य झाले आहे.

कावेरीवरील सर्वात पहिले धरण 'स्टोन अनिकट' हे 1600 वर्षांपूर्वी

बांधले गेले असे आपण अभिमानाने सांगतो, पण नदीवर धरण बांधणे ही सोपी गोष्ट नव्हे. हे स्टोन अनिकट धरण 1800 वर्षांपूर्वी बांधले गेले असेही काही इतिहासकार म्हणतात. कावेरीच्या दोन्ही तटांवर 160 किलोमीटर्स लांबीच्या भिंती आहेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेल्या करिकल या चोलवंशातील राजाने त्या बांधल्याचा निश्चित पुरावा आहे. या करिकलानेच 'स्टोन अनिकट' बांधले असे काही इतिहासकार मानतात. आजच्यासारखे स्थापत्यशास्त्र ज्या काळी नव्हते, तेव्हा हे प्राचीन धरण बांधले गेले. फक्त दगड आणि माती यांचे हे धरण शतकांमागून शतके उलटली तरी कायम राहिले आहे. ते कसे बांधण्यात आले असावे हा एक चमत्कारच वाटतो. एकोणिसाव्या शतकात त्याचा विस्तार करून ते पुन्हा बांधण्यात आले आणि 'ग्रॅण्ड अनिकट' असे नाव त्याला देण्यात आले. ग्रॅण्ड अनिकटचे अजस्त्र बांधकाम तामिळनाडूतील जलदृश्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

नदीचा पूर म्हणजे प्राणसंकट आणि विध्वंसच ! पण पूर येणार असल्याची लोकांना आधीच कल्पना आली, तर या संकटाला तोंड देता येते, होणारे बरेच नुकसान टाळता येते. तामिळनाडूतील लोक कावेरीला येणाऱ्या पुरांना तोंड देण्याची काळजी घेऊनच थांबत नाहीत, तर ते या पुराचासुद्धा उत्सव साजरा करतात. 'अठराव्याचा पूर' म्हणून हा सण ओळखला जातो. आदी ( जुलै-ऑगस्ट ) महिन्यातल्या अठराव्या दिवशी हजारो लोक नदीची पूजा करतात. यावेळी समृध्दीचे निदर्शक म्हणून लोक खास दिवे पेटवतात आणि कावेरीला मिठाई, फळे व फुले अर्पण करून तिच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतात. हा दिवस लोक खूप आनंदात घालवतात, कावेरीच्या तीरावर सहलीला जातात.

कर्नाटकात कावेरीवर कान्नमवाडी धरण कोणी बांधले ते तुम्हाला माहीत आहे ? सांगतो. शंभरावर वर्षे लोटली त्या गोष्टीला. म्हैसूरमधील एका

खेड्यातील शाळेत संस्कृतचा वर्ग सुरू होता. शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या पुस्तकातल्या पुढच्या धड्याबद्दल सांगत होते. उत्तम आरोग्याची महती सांगणारा धडा होता तो. बोलता बोलता गुरुजी एकदम थांबले आणि त्यांचा शब्द न् शब्द पिऊन घेणाऱ्या एका गोऱ्या हडकुळ्या मुलाकडे बोट दाखवून म्हणाले, "आपण चांगल्या आरोग्यासंबंधी बोलतो आहोत. पण विश्वेश्वरनकडे पहा. या तरुण मुलाची प्रकृती कशी दणकट हवी, पण तो किती रोड आणि हडकुळा आहे बघा. तो असाच राहिला तर जेमतेम तीस वर्षे तो जगेल."

पण छोट्या विश्वेश्वरनचे आयुष्य तिसाव्या वर्षी संपले नाही. मोठा होऊन तो भारताचा एक महान् औद्योगिक इंजिनीअर बनला आणि 'भारतरत्न' पदवीचा मानकरी ठरला. भारतीय नागरिकाचा हा सर्वोच्च मान. एवढेच काय, पण आपला 101 वा वाढदिवस सबंध राष्ट्राने साजरा केलेला पाहण्याचे भाग्य त्याला लाभले. भारताच्या मानकऱ्यांत सर एम. विश्वेश्वरय्या यांचे नाव आघाडीवर आहे.

या दीर्घायुष्यात त्यांनी इतकी विविध व प्रचंड कामगिरी केली की त्यांच्याबद्दल काय सांगावे आणि त्याला कुठून सुरुवात करावी हे ठरवणेच अवघड आहे. ते म्हैसूरचे दिवाण झाले (स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी म्हैसूर हे संस्थान होते, तेव्हाची ही गोष्ट आहे). म्हैसूर विद्यापीठ आणि म्हैसूर बँक उभारण्याचे व भद्रावती पोलाद कारखाना आणि इतर अनेक औद्योगिक उपक्रम सुरू करण्याचे श्रेय त्यांचे आहे.

या सर एम. विश्वेश्वरय्यांनीच कन्नमबाडी धरणाची आरवणी केली. हेमावती आणि लक्ष्मणतीर्थम या नद्या कावेरीला जिथे मिळतात तिथून जरा पुढे हे धरण बांधण्यात आले आहे. या तीन नद्यांचे पाणी येथे एका प्रचंड तळ्यात 40 मीटर उंचीच्या व 2600 मीटर लांबीच्या धरणाने साठवण्यात



आले आहे. या साठवलेल्या पाण्याने बनलेल्या सरोवराच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ 128 चौरस किलोमीटर्स आहे. या धरणाचे काम 1911 मध्ये सुरू झाले आणि ते पूर्ण व्हायला 12 वर्षे लागली. धरणाने निर्माण झालेल्या पाण्याच्या सांठ्यास कृष्णार्जुनसागर असे नाव म्हैसूरच्या तेव्हाच्या राजाच्या नावावरून देण्यात आले.

कृष्णार्जुनसागराच्या काठी म्हैसूरमधील अत्यंत सुंदर असे उद्यान आहे. त्याला वृन्दावन असे अगदी शोभण्यासारखे नाव देण्यात आले आहे. कृष्णाचे बालपण वृन्दावनातच तर मित्रमंडळींबरोबर हसण्या-बागडण्यात गेले ना! माणसाचे कौशल्य आणि निसर्गाचे सौंदर्य यांचा मनोहर संगम वृन्दावन उद्यानात झाला आहे. इथली प्रत्येक गोष्ट उद्यानास भेट देणाऱ्याचे लक्ष वेधून घेते. दगडी पायऱ्यांवरून कावेरीचे पाणी खळखळत गाणे म्हणत उड्या मारीत उतरते. रात्रीच्या वेळी चातुर्याने केलेली प्रकाशयोजना उद्यानाचे पऱ्यांच्या राज्यात रूपान्तर करून टाकते. कारंजी आपल्या नाजुक तुषारांनी वातावरण शीतल करतात. असंख्य रंगांची दिमाखाने उधळण करणारी फुले, कलात्मक आकार दिलेली झुडुपे आणि रेशमी गालिच्यासारखी मुलायम हिरवळ, ही पंचेन्द्रियांना आनंद देतात. एके काळी हा भाग मलेरियाग्रस्त होता. लोक तेव्हा इथे यायला घाबरत. आज हे आन्तरराष्ट्रीय पर्यटकांचे महत्वाचे आकर्षण बनले आहे. आता प्रत्येक धरणाशेजारी एक सुंदर उद्यान असते. ही परम्परा 'वृन्दावन' ने सुरू केली.

कावेरीवर म्हैसूरमध्ये असलेल्या धरणांत कन्नमवाडी धरण पहिले आणि सर्वांत मोठे आहे. तामिळनाडूतही अनेक धरणे आहेत. त्यातली तीन 'अनिकट' धरणे आहेत – ग्रॅण्ड अनिकट, अप्पर अनिकट आणि लोअर अनिकट. लोअर अनिकट प्रत्यक्ष कावेरीवर नसून तिच्या कोलरन नावाच्या शाखेवर आहे. ही कोलरन म्हणजे एक वेगळी नदीच आहे. शिवाय सीता आणि पाला डोंगर जोडून बांधलेले मेत्तूर धरण आहे. येथील खोऱ्यातून वाहात कावेरी ग्रॅण्ड अनिकटपाशी येते. हे धरण भारत स्वतंत्र होण्याच्या 20 वर्षांपूर्वी बांधले आहे.

कावेरीवर दोन मोठे आणि अनेक लहान धबधबे आहेत. त्यापैकी म्हैसूरमधील शिवसमुद्रम धबधबा ही कावेरीने दिलेली एक अतिशय देखणी देणगी आहे. इथे कावेरीचे पाणी 90 मीटर्स कड्यावरून खाली कोसळते- खाली

कोसळून पाण्याचा होणारा पांढराशुभ्र फेस आणि नाचणारे लखलखते पाणी वितळलेल्या रुप्यासारखी दिसतात. या शुभ्र तुषारांवर सूर्यकिरणे पडली की असंख्य इन्द्रधनुष्ये तिथे उधळली जातात. हे दृश्य इतके मनोरम असते की तास न् तास त्याच्याकडे पाहात बसले तरी डोळे शिणत नाहीत.

कन्नड प्रदेशातून (म्हैसूर) तामिळ प्रदेशात (तामिळनाडू) कावेरी प्रवेश करते, तिथे दुसरा धबधबा आहे. तो होकेनागल धबधबा म्हणून ओळखला जातो. कानडी भाषेत 'होके' म्हणजे धूर. खडकावर कोसळणारे पाणी इतके उंच उसळते की दुरून ते धुरासारखे दिसते. मेत्तूर धरण इथून फार दूर नाही.

कृष्णासागरातील पाणी कालव्यांच्या जाळ्याने हजारो एकरांत खेळवण्यात आले आहे. त्यावर तिथे धान्य, भाज्या आणि फळे पिकवली जातात. याशिवाय पडणाऱ्या पाण्याच्या शक्तीपासून वीज तयार केली जाते. तिला जलविद्युत म्हणतात. शिवसमुद्रम धबधब्याच्या पाण्याचा जलविद्युत-निर्मितीसाठी उपयोग केला जातो. परासुखी आणि गगनसुखी अशा दोन नद्यांत कावेरी इथे विभागली जाते. त्यांच्या खाली कोसळणाऱ्या पाण्यापासून वीज तयार करतात. खरे म्हणजे शिवसमुद्रम प्रकल्प हा भारतातील पहिला जलविद्युत प्रकल्प आहे. इथे निर्माण झालेल्या विजेने म्हैसूरमधील हजारो छोटी छोटी खेडी प्रकाशाने उजळली. या विजेवर राज्यभर गिरण्या आणि कारखाने चालतात. शिवसमुद्रमच्या विजेवर कोलार येथील सोन्याच्या खाणी आणि भद्रावती पोलाद कारखाना, तसेच अनेक साखर-कारखाने आणि सुती व रेशमी कापडाच्या गिरण्या चालतात.

मेत्तूरच्या धरणातील पाण्याचा दोन प्रकारे उपयोग केला जातो. त्यातले काही पाणी कृष्णार्जुनसागराप्रमाणे शेतीसाठी वापरले जाते. काही पाण्याचा उपयोग शिवसमुद्रमप्रमाणे वीजनिर्मितीसाठी केला जातो. होकेनागल धबधबा

हा केवळ एक सुंदर जलप्रपात आहे— निसर्गाची ती एक देखणी देणगी आहे.

कावेरी वाहात जाताना काही ठिकाणी तिला इतर नद्या कशा येऊन मिळतात किंवा तिचेच दोन भाग कसे होतात, ते आपण पाहिले. वाहात जाताना तीन वेळा कावेरीचे दोन भाग होतात आणि तिन्ही ठिकाणी काही किलोमीटर्सपर्यंत वेगळे वाहात जाऊन हे प्रवाह पुन्हा एकत्र होतात. अशा वेळी



शिवसमुद्रम धबधबा




त्या प्रवाहांनी वेढलेल्या जमिनीचे एक बेटच तयार होते.

अशा प्रकारचे कावेरीतले पहिले बेट म्हैसूर राज्यात आहे. तिथे कावेरीचे दोन प्रवाह 13 किलोमीटर्सपर्यंत वेगवेगळे वाहात जातात व नंतर पुन्हा एकत्र येतात. त्यामधल्या बेटावर म्हैसूरच्या राजांची एके काळी राजधानी असलेले श्रीरंगपट्टण हे प्रसिद्ध शहर वसले आहे. टिपू सुलतान आणि इंग्रज यांच्यातली ऐतिहासिक लढाई इथेच झाली आणि इथेच टिपूला वीरमरण आले. या शहरापासून काही किलोमीटर्स अंतरावर देशभरच्या पक्षीप्रेमिकांना आकर्षून घेणारे पक्ष्यांचे विख्यात अभयारण्य आहे. विविध प्रकारचे करकोचे आणि इतर नाना प्रकारचे पक्षी जून महिन्यात येथे वसतीला येतात आणि घरटी बांधून जुलै आणि ऑगस्टमध्ये येथे राहतात.



टिपूच्या राजवाड्यातील एक चित्र



टिपूची छत्री

श्रीरंगपट्टण मागे टाकल्यावर कावेरीला अनेक छोटया नद्या आणि ओढे येऊन मिळतात, आणि तिचे पात्र रुंद व प्रवाह वेगवान होत जातो. पण काही अंतर गेल्यावर नदी जेव्हा उंचवटयाच्या प्रदेशात येते तेव्हा तिचे दोन प्रवाह

होतात आणि शिवसमुद्रम. धबधब्याप्रमाणे ते एकत्र येऊन खाली कोसळतात. पण एकत्र येण्यापूर्वी दोन स्वतंत्र नद्यांप्रमाणे हे प्रवाह पाच किलोमीटर्सपर्यंत वाहात जातात आणि त्यांच्यामध्ये शिवसमुद्रम नावाचे आणखी एक बेट तयार होते. हे बेट जंगलमय आहे. अनेक वन्य श्वापदे तेथे असून तेथील निसर्गशोभा रमणीय आहे.

कावेरीतले तिसरे बेट तामिळनाडूमध्ये आहे. कावेरीपासून कोलरन नावाची शाखा वेगळी निघून सुमारे 43 किलोमीटर्सपर्यंत वेगळी वाहात जाते, व नंतर पुन्हा मुख्य नदीला मिळते. अशातऱ्हेने जे बेट तयार होते त्यावर श्रीरंगम हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे.



पक्ष्यांचे अभयारण्य



कावेरीच्या तीरावर अनेक तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे आहेत. ती पवित्र आहेत यात शंकाच नाही, पण प्रत्यक्ष कावेरी नदीच म्हैसूर आणि तामिळनाडूमधील लोकांना सर्वांत महत्त्वाची वाटते. कावेरीच्या दोन्ही तीरांवर मैल न मैल पसरलेली हिरवीगार शेते, केळीच्या बागा, उसाचे मळे आणि भव्य वृक्षराजी ही कावेरीची खरी देणगी आहे. म्हैसूरचे आणि तामिळनाडूमधील तंजावर जिल्ह्याचे कावेरी नदीने दक्षिणेकडील धान्याच्या कोठारात रूपान्तर करून टाकले आहे. तामिळ भाषेत तर एक म्हणच आहे की— तंजावर जिल्ह्यातील मातीचा प्रत्येक कण त्याच्या भारंभार सोन्याच्या तोलाचा आहे. हे कावेरीचे उपकारच म्हणायचे.

आपल्या काठावर वसलेल्या गावांवरही कावेरीने आपला ठसा उमटवला आहे. प्रत्येक गावात या नदीबद्दलच्या अनेक कहाण्या सांगितल्या जातात. त्या सगळ्यांचा उल्लेखसुद्धा करणे अशक्य आहे. या भागात नदीसाठी होणाऱ्या उत्सवांबद्दलच नुसते लिहायचे म्हटले तर एक मोठा ग्रंथ तयार होईल. त्यातल्या दोनची आम्ही इथे थोडक्यात माहिती देतो. यातला एक आहे कुंभकोणम. या तामिळनाडूतील शहरात दर 12 वर्षांनी एकदा होणारा महामखम उत्सव. उत्तरेकडे त्रिवेणी संगमावर होणाऱ्या कुंभमेळ्याइतकाच तो प्रसिद्ध आहे. महामखमच्या दिवशी हजारो यात्रेकरू कुंभकोणमला जमतात, तेथील टाक्यात आणि कावेरीतही स्नान करतात.

दुसरे आहे मयूरम नावाचे एक सुंदर शहर. ते नदीच्या जवळजवळ मुखाकडे आहे. तिथल्या हिरव्यागार शेतात व घनदाट जंगलात राहणाऱ्या देखण्या मोरांसाठी मयूरम प्रसिद्ध आहे. तेथील निसर्गसौंदर्य या मोरांमुळे अधिकच रमणीय बनले आहे. 'मयिलादुथुराई' किंवा थुई थुई नाचणाऱ्या मोरांचा नदीतीर या नावानेही लोक या भागास ओळखतात.



तिरुवय्युरू शहराचा उल्लेख केल्याशिवाय कावेरीचे वर्णन पूर्ण होत नाही. कावेरीला चार उपनद्या इथे मिळतात. इथल्या मंदिरातील देवतेस अय्यरप्पन म्हणजे पंचनद्यांची देवता असे म्हटले जाते. पण तिरुवय्युरू प्रसिद्ध आहे ते कर्नाटक संगीतातील विख्यात रचनाकार संत त्यागराज याची जन्मभूमी म्हणून.

# गोदावरी

दक्षिणेतल्या बहुतेक नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहातात. पश्चिम घाटात त्या उगम पावतात आणि बंगालच्या उपसागराला जाऊन मिळतात. पश्चिम घाटातील ब्रह्मगिरीच्या डोंगरात कावेरी उगम पावते. दक्षिणेकडील नद्यांत सर्वात लांब वाहात जाणारी नदी गोदावरी. ती याच घाटात उत्तरेकडे उगम पावते. कावेरीप्रमाणेच गोदावरीही अरबी समुद्राच्या परिसरात जन्म घेते आणि पूर्वेला बंगालच्या उपसागराला मिळते. ती कावेरीच्या दुप्पट लांब आहे.

गोदावरीला दक्षिणगंगा असेही म्हणतात. भारतातील पवित्र नद्यांत तिची गणना होते. कारण रामायणाशी तिचा संबंध आहे. या नदीच्या प्रत्येक वळणाशी आणि तिच्यातील प्रत्येक खडकाशी प्रभू रामचन्द्राच्या कथेचा संबंध आहे. तिच्या तीरावरील अनेक शहरे, खेडी आणि जंगले यांना राम, लक्ष्मण आणि सीता यांचे पाय लागले होते किंवा त्यांनी तेथे काही काळ वास्तव्य केले होते असे सांगतात.

उदाहरणार्थ, नासिकजवळची पंचवटीच घ्या. वाल्मीकीरामायणात उल्लेख असलेली, अयोध्या सोडल्यावर लक्ष्मण व सीतेसह राम जिथे राहिले ती पंचवटी हीच असे लोक मानतात. याच ठिकाणी लक्ष्मणाने रावणाची बहीण

शूर्पणखा हिचे नाक कापले होते, असे लोक म्हणतात. शूर्पणखा इथे रामाला पहायला आली होती, आणि अयोध्येच्या या देखण्या युवराजाच्या प्रेमात पडली होती. तिने एवढी धिटाई दाखवली की, लक्ष्मणाने संतापून तिला शिक्षा



नासिक

म्हणून तिचे नाकच कापून टाकले.

आपला पिता राजा दशरथ याच्या मृत्यूचे वृत्त कळल्यावर राम-लक्ष्मणाने इथेच स्नान केले होते, असे मानले जाते. हिंदूंमध्ये जवळचा आप्त मरण पावल्यावर स्नान करून शुचिर्भूत होण्याची प्रथा आहे. महात्मा गांधी इंग्लंडहून आल्यावर आपल्या मातेच्या निधनाची वातमी त्यांना समजली तेव्हा नासिकच्या गोदावरीतच त्यांनीही स्नान केले होते.


कावेरीप्रमाणेच गोदावरीलाही वाहात जाताना अनेक उपनद्या येऊन मिळतात. त्यातली पहिली नदी प्राणहिता. ती महाराष्ट्रात उगम पावते. पुढे गोदावरीला इन्द्रावती आणि शबरी (रामकथेशी संबंध असलेले आणखी एक नाव) या नद्या येऊन मिळतात. अशा अनेक लहानमोठ्या नद्या मिळाल्यामुळे गोदावरीची रुंदी चार किलोमीटर्स होते. मात्र तिची रुंदी सर्वत्र सारखीच आहे असे नाही. पूर्व घाटाकडे वाहात जाताना काही ठिकाणी ती अरुंद आहे, तिच्यात तिथे पाणीही कमी असते. पण गोदावरी राजमहेन्द्रीला (पूर्वीचे राजमहेन्द्रवरम्) पोचल्यावर तिचे पात्र दृष्टी ठरत नाही इतके विशाल बनते. राजमहेन्द्रीला गोदावरीवर असणारा रेल्वे पूल त्याची कल्पना देतो. भारतातला हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पूल असून त्याला 56 कमानी आहेत.

राजमहेन्द्री शहराला थोर परम्परा आणि इतिहास आहे. मोठमोठ्या राजघराण्यांचा उदय आणि अस्त त्याने पाहिला आहे. दर बारा वर्षांनी तिथे होणाऱ्या पुष्करम् उत्सवास प्रयागचा कुंभमेळा व कुंभकोणमचा महामखम यांच्याइतकीच यात्रेकरूंची प्रचंड गर्दी जमते. इथे गोदावरीच्या तीरी मार्कण्डेय आणि कोटिलिंगेश्वर यांची कुठेही सहसा न आढळणारी देवळे आहेत. यात्रेकरूंना ते खास आकर्षण असते. नामवंत कवी, निबंधकार, कादंबरीकार आणि नाटककार यांची राजमहेन्द्री ही जन्मभूमी. अकराव्या शतकात होऊन

गेलेला विख्यात अभिजात कवी नान्नया आणि आधुनिक तेलुगू गद्याचा जनक वीरेशलिंगम पंतुलू या दोघांचाही जन्म इथेच झाला व ते इथेच राहिले. साहित्यिक चळवळींचे ते आजही महत्त्वाचे केन्द्र आहे.

राजमहेन्द्रीला पोचण्यापूर्वी आपल्याला रामाशी संबंध आलेले गोदाकाठचे आणखी एक गाव लागते. त्याचे नाव भद्राचलम. गोदावरीच्या संस्कृतीचे या सर्वांगसमृद्ध गावात प्रतिबिंब पडले आहे, असे म्हणता येईल. इथे टेकडीवर उभे असलेले रामाचे मंदिर सर्वांत जुने राममंदिर मानले जाते. रावणाने सीतेला जिथून पळवले असे म्हणतात ते पर्णशाला हे ठिकाण भद्राचलमहून 30 किलोमीटर्सवर आहे. इथेच राम-लक्ष्मणाने लंकेला जाण्यासाठी गोदावरी ओलांडली.

रामदास या थोर रामभक्ताचे गाव म्हणून भद्राचलम अधिक प्रसिद्ध आहे. कबीर आणि मीराबाई इतकीच या रामदासाची भजने देशभर प्रसिद्ध आहेत. रामदासाची गोष्ट खरी गोष्ट आहे. रामदास ही ऐतिहासिक व्यक्ती आहे—नुसती दंतकथा नव्हे. त्याचे खरे नाव रामदास नसून गोपण्णा होते आणि तो तहसिलदार होता.




अशी कथा सांगतात की, थिम्मक्का नावाची एक वृद्ध स्त्री या गावात राहात असे. तिला एका रात्रीं स्वप्न पडले. स्वप्नात तिला टेकडीवरील जंगलात तीन मर्ती दिसल्या. दुसऱ्या दिवशी ती आपल्या मुलीला घेऊन काटेकुटे तुडवीत झाडाझुडुपांतून टेकडीवर गेली. आणि काय नवल ! खरोखरीच तिला स्वप्नात दिसल्या तिथेच राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्ती मिळाल्या. अत्यन्त आनंदाने आणि भक्तिभावाने तिने ती जागा स्वच्छ केली आणि मूर्तींचे उन्हापावसापासून रक्षण व्हावे म्हणून त्यांच्यावर गवताचे छप्पर घातले. दररोज ती वृद्ध स्त्री टेकडी चढून जाई आणि त्या मूर्तींची पूजा-प्रार्थना करी. तिच्या टेकडीकडे होणाऱ्या फेऱ्यांबद्दल लोकांना कुतूहल वाटू लागले. ती कुठे जाते, कशाला जाते याबद्दल लोक तर्ककुतर्क करू लागले. लोकांनी तिला विचारले तशी ती म्हणाली, मी रोज मंदिरात जाते. यावर लोक हसले. त्यांना ते खरे वाटले नाही. त्या टेकडीवर सर्वत्र घनदाट जंगल होते. तिथे देऊळ येणार कुठून ?

लवकरच थिम्मक्का आणि तिचे देऊळ यांची हकीकत तिथला तहसिलदार गोपण्णा याच्या कानावर गेली. त्याने त्या वृद्धेचे सांगणे हसण्यावारी नेले नाही. तो टेकडीवर गेला आणि थिम्मक्काने सांगितलेल्या जागी तिचे देऊळ, गवती छपराखालील राम लक्ष्मण सीतेच्या त्या मूर्ती त्याला दिसल्या. आजूबाजूचे रान तोडून ते देऊळ बांधण्यात आलेले होते आणि अतिशय स्वच्छ ठेवलेले होते. गोपण्णा त्या मूर्तीकडे टक लावून पहात असतानाच त्याच्यात एक मोठा बदल घडून आला. मूर्तीवर खिळलेली त्याची नजर तिथून दूर होईना. त्याचे सर्वांग आनंदाने थरथरू लागले. टेकडीवरील या क्षणासाठीच जणु आपण जगत आलो असे त्याला वाटले.

गोपण्णाने टेकडीवरच मुक्काम केला. मूर्तीसाठी त्याने दगडी देवालय वांधले. तिथे पूजा करताना त्याच्या मुखातून कविता आणि गाणी बाहेर पडू लागली. लवकरच भद्राचलमच्या लोकांची गोपण्णा व त्याचे देऊळ यांना पाहण्यासाठी रीघ लागली. ते त्याला भद्राचल रामदास म्हणू लागले.

भद्राचलम देवालय



त्याची गाणी आणि कथा यामुळे हे नाव आंध्रभर आबालवृद्धांच्या तोंडी झाले.

लहानसे भद्राचलम खेडे आता सर्वांना माहीत असणारे मोठे गाव बनले आहे. तिथली टेकडीही बदलली आहे. थिम्मक्काला सापडलेल्या मूर्तीसाठी रामदासाने बांधलेल्या दगडी मंदिराभोवती आता 24 देवळे उभी आहेत. या देवळांकडे जाण्यासाठी मोटारबोटीतून गोदावरी नदी ओलांडावी लागते, आणि रानही ओलांडावे लागते.

पूर्वी गोदावरीच्या पाण्याचा फारसा उपयोग होत नसे. ते बहुतेक सगळे समुद्रातच वाहून जाई. दुष्काळ वारंवार पडं. सर आर्थर कॉटन या ब्रिटिश अधिकाऱ्याने धवलेश्वरमजवळ या नदीवर धरण बांधण्याची आणि त्यातून कालव्यांनी सर्वत्र पाणी खेळवण्याची कल्पना सुचवली. अशा प्रकारे जमीन भिजल्यामुळ दुष्काळ टाळता येणार होते. त्याच्या प्रयत्नांनी 1845 मध्ये नदीवर धरण बांधायला सुरुवात झाली. दोन वर्षांत ते बांधून पूर्ण झाले. तीन मोठे कालवेही खणण्यात आले. त्यामुळे गोदावरी जिल्हा हा देशातील एक अतिशय सुपीक भाग बनला.

दक्षिण भारतातील लोक सर आर्थर कॉटनचे कृतज्ञतेने स्मरण करतात. तो इंग्लंडमधून भारतात आला तेव्हा अवघा सतरा वर्षांचा मुलगा होता. पाटबंधारे खात्यात तो काम करी. स्टोन अनिकट हे कावेरीवर चोल राजांनी बांधलेले जुने धरण पाहून तो प्रभावित होऊन गेला. त्याने ते दुरुस्त केले आणि कावेरीच्या दोन्ही बाजूंच्या जमिनीस अधिक पाणी मिळावे या दृष्टीने त्यात सुधारणा केल्या. कावेरीवरील मेलानाई म्हणजे अप्पर अनिकट या

दुसऱ्या मोठ्या धरणाची आखणी व बांधणी त्यानेच केली.

याच सर आर्थरने विजयवाड्याजवळ कृष्णा नदीवर धरण बांधले. ते धरणच त्याने बांधले असे नाही तर त्यापासून काढावयाच्या कालव्यांच्या जाळ्याची आखणीही त्याने केली. या कालव्यांमुळे टाक्यांना व तळ्यांना पाणी पुरवठा होणार होता.


धवलेश्वरम धरण त्या भागातील लोकांना गेली 120 हून अधिक वर्षे मोठे वरदानच ठरले आहे. पण आता ते जीर्ण होऊ लागले आहे. त्यामुळे आता धवलेश्वरमपासून 64 किलोमीटर्सवर नवे अनिकट बांधण्याची योजना आहे. नव्या अनिकटच्या पायाचा दगड एप्रिल 1970 मध्ये बसवण्यात आला. जुन्या धरणाची आखणी व बांधणी करणारे आणि भारतातील पाटबंधारे विषयक इंजिनिअरिंगाचे एक उद्गाते सर आर्थर कॉटन यांचे नाव या नव्या धरणाला देण्यात येईल.

धवलेश्वरमनंतर गोदावरीचे दोन भाग होतात. पूर्वेकडून वाहाणाऱ्या प्रवाहास गौतमी गोदावरी आणि पश्चिमेकडून वाहाणाऱ्या प्रवाहास वसिष्ठा गोदावरी अशी नावे आहेत. त्यांच्यामध्ये तिसरीही एक उपनदी आहे. तिला वैष्णव गोदावरी म्हणतात. समुद्राला मिळण्यापूर्वी या तीन प्रवाहांमुळे त्रिभुज प्रदेश तयार होतो. गौतमी गोदावरी समुद्राला येनम येथे मिळते, वसिष्ठा गोदावरी नरसापूर येथे मिळते तर वैष्णव गोदावरी नागरा येथे मिळते.

नद्या समुद्राला मिळताना जे त्रिभुज प्रदेश तयार होतात ते बहुतेक सुपीक आणि संपन्न असतात. अशा भागात जमिनीला फार मोठी मागणी असते. गोदावरीच्या त्रिभुज प्रदेशाने एके काळी डच, फरेंच आणि इंग्रज यांना आकर्षून घेतले होते. या तिन्ही लोकांनी येथे व्यापार सुरू केला आणि कंपन्या स्थापन केल्या. गौतमी गोदावरी समुद्राला मिळते तेथील येनम नावाच्या भागावर

फरेंचांच्या वास्तव्याच्या खुणा अजूनही दिसतात.

गोदावरीचा जलमार्ग म्हणून चांगला उपयोग होतो. त्यावरून मोठ्या प्रमाणात जहाजवाहतूक चालते. लाकडाचे मोठमोठे ओंडके रस्त्याने वा जहाजातून नेण्याऐवजी पाण्याच्या प्रवाहात सोडून दिले जातात व तरंगत दूरदूरच्या ठिकाणी पोचवले जातात. गोदावरीचा काठ साग आणि बांबू यांच्या जंगलांनी समृद्ध आहे.



# कृष्णा

दक्षिण भारतातील पूर्वेकडे वाहाणारी दुसऱ्या क्रमांकाची मोठी नदी कृष्णा. तिचा उगमही महाराष्ट्रातील पश्चिम घाटातच होतो. हे उगमस्थान समुद्रसपाटीपासून 1400 मीटर्संवर महाबळेश्वरजवळ आहे. हे ठिकाण मुंबईच्या आग्नेयेस 145 किलोमीटर्संवर आणि अरबी समुद्रापासून 60 किलोमीटर्संवर आहे. हा भाग मुसळधार पावसाचा आहे.


गोदावरी आणि कावेरी प्रमाणेच कृष्णेचा उगमही झऱ्यापासून होतो. तो झरा कधीही सुकत नाही. ज्या खडकातून कृष्णेचा उगम होतो त्या खडकाचा आकार गायीच्या डोक्यासारखा आहे. त्यामुळे ही नदी जणु गोमुखातून बाहेर पडते आहे असे वाटते. तळाच्या एका लहानशा तलावात हे पाणी पडते.

कृष्णा आणि गोदावरी या नुसत्या नद्या नव्हेत, ते नद्यांचे जाळे आहे. कावेरी ही नुसती नदी आहे. ती खूप मोठी, सुंदर, प्रिय अशी नदी असली तरी ती एकटी एकच नदी आहे. तिला अधूनमधून उपनद्या मिळतात पण मोठाल्या ओढ्यांपेक्षा त्या मोठ्या नाहीत. उलट कृष्णा आणि गोदावरी यांना मोठमोठ्या नद्या येऊन मिळतात. कृष्णा नदीच्या सुमारे 10 मुख्य उपनद्या आहेत. त्यातल्या किमान दोन चांगल्याच मोठ्या नद्या असून त्यांच्या स्वतःच्या-सुद्धा उपनद्या आहेत.

कृष्णेला मिळणाऱ्या दोन मोठ्या नद्या म्हणजे भीमा आणि तुंगभद्रा. कृष्णा महाराष्ट्राबाहेर पडून आंध्रप्रदेशात प्रवेश करण्यापूर्वी भीमा तिला मिळते. तुंगभद्रा कृष्णेला आंध्रप्रदेशात कर्नूल येथे मिळते. तुंगभद्रा ही कृष्णेची सर्वात लांब व महत्त्वाची उपनदी आहे. हैदराबादच्या दक्षिणेस उगम पावून दक्षिणेकडे वाहात जाणारी मुसी ही कृष्णेची तिसरी उपनदी होय. सोळाव्या आणि सतराव्या शतकात हिऱ्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या गोवळकोंडा येथील किल्ल्याशी मुसीचा ऐतिहासिक संबंध आहे.

इतर भारतीय नद्यांप्रमाणे कृष्णेच्या तीरावरही अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. त्या सर्वात महत्त्वाचे आहे श्रीशैलम. आंध्र प्रदेशात कर्नूल जिल्ह्यात ते एका पठारावर आहे. या पठाराच्या पायथ्याशी असलेल्या खोल खोऱ्यातून कृष्णा वाहाते. अशा निसर्गरमणीय पार्श्वभूमीवर श्रीशैलम वसले आहे. तेथील मल्लिकार्जुनाचे प्राचीन मंदिर तेथील शिल्प, कोरीव काम आणि रामायण – महाभारतातील प्रसंग रंगवणारी चित्रे यासाठी प्रसिद्ध आहे. मंदिराच्या पूर्वेस तीन किलोमीटर्स चालून गेल्यावर आणि डोंगराच्या एक हजार पायऱ्या उतरल्यावर खाली वाहाणाऱ्या कृष्णा नदीचे दर्शन होते. येथे तिला पाताळगंगा म्हणतात. कोंडावीडूच्या रेड्डींनी पंधराव्या व सोळाव्या शतकांत या डोंगराला पायऱ्या बांधल्या, असा उल्लेख आढळतो. हिवाळा संपल्याचे दर्शविणारा महाशिवरात्रीचा उत्सव येथे महत्त्वाचा. त्या दिवशी हजारो यात्रेकरू येथे जमतात,





मल्लिकार्जुन देवालय

पाताळगंगेत स्नान करतात आणि मल्लिकार्जुनाचे दर्शन घेतात.

या देवळात कोणत्याही जाती-जमातीस मज्जाव नाही. कोणालाही मंदिरात प्रवेश करता येतो. स्त्री-पुरुष देवळाच्या अगदी गाभाऱ्यापर्यंत जाऊन पूजा-अर्चा करू शकतात. पाताळगंगेचे पाणी आणून भक्त स्वतः त्या पाण्याने देवाला स्नान घालू शकतात. भक्तांच्या दृष्टीने ही असामान्य पर्वणीच. या प्रथेमागे एक कथा आहे चेन्चू नावाची एक डोंगरी जमात येथे राहते. या जमातीतील लक्ष्मी नावाच्या मुलीशी भगवान शंकरांनी विवाह केला अशी ती कथा आहे. तेव्हापासून या जमातीच्या लोकांना मंदिरात प्रवेशाची मुभा मिळाली. चेन्चू लक्ष्मीच्या प्रेमकथेवर अनेक गाणी या भागात रचली गेली आहेत.

आठव्या शतकात होऊन गेलेले महान् तत्त्वज्ञ आद्य शंकराचार्य यांनी श्रीशैलमला भेट देऊन तेथे काही काळ वास्तव्य केले होते. ते प्रतिदिनी पाताळगंगेत स्नान करीत. मल्लिकार्जुन आणि त्याची पट्टराणी यांच्यावर त्यांनी रचलेली स्तुतिस्तोत्रे भारताच्या भक्तिगीतांत प्रसिद्ध आहेत.

रायचूरजवळ कृष्णा घाटावरून खाली उतरते. पाच किलोमीटर्स अंतरात ती जवळजवळ 120 मीटर्स खाली उतरते. पावसाळ्यात तिच्या रोरावत वाहाणाऱ्या पाण्याची गर्जना कित्येक मैलपर्यंत ऐकू जाते. येथून कृष्णा पूर्वेला विजयवाड्याकडे डोंगराळ प्रदेशातून वाहात जाते. विजयवाड्याच्या दक्षिणेस काही किलोमीटर्सवर कृष्णेचा त्रिभुज प्रदेश सुरू होतो.


या नदीवर पहिले धरण 1855 साली विजयवाड्याबाहेर बांधण्यात आले. तेथे एकमेकापासून एक किलोमीटर दूर असणाऱ्या दोन डोंगरांतून कृष्णा वाहते. हे धरण बांधण्यास 1853 मध्ये सुरूवात झाली व 1855 मध्ये

ते पूर्ण झाले. ते 1140 मीटर्स लांब असून नदीच्या पात्रापासून त्याची उंची सहा मीटर्स आहे. येथून कालव्यांचे विस्तृत जाळे पसरवून जमीन भिजवण्यात आली आहे.

या धरणापर्यंत कृष्णा डोंगराळ प्रदेशातून वेगाने वाहाते. त्यामुळे नौकानयनासाठी तिचा उपयोग करता येत नाही. पण विजयवाड्यानंतर मासेमारीसाठी नदीत लहान होड्या फिरवता येतात.

विजयवाडा शहर डोंगरांच्या कोंदणात वसले आहे. असे सांगतात की, या डोंगरातच अर्जुनाने श्रीशंकरासाठी तपश्चर्या केली होती. त्याच्या भक्तीने प्रसन्न होऊन श्रीशंकरांनी त्याला अजिंक्य करणारे अमोघ अस्त्र दिले. आजचे विजयवाडा शहर आंध्रप्रदेशातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक आणि व्यापारी केन्द्र आहे. ते मोठे रेल्वे जंक्शनही आहे. येथील जमीन कापूस व भात या पिकांसाठी उत्तम आहे.


या भागात एके काळी बौद्धधर्माचा खूप प्रसार झालेला होता. कृष्णातीरी असलेल्या शहरांत हे सिद्ध करणारे अवशेष आणि भग्न वास्तू आढळतात. असे म्हणतात की, अमरत्त्वाचे वरदान मिळालेले लोक एके काळी येथे राहात. म्हणूनच अमरावती असे नाव येथील नगरास पडले. सध्याच्या अमरावती शहराजवळ धरणीकोटा (धन्यकटकम) नावाचे नगर पूर्वी होते. ते एक



महत्त्वाचे बौद्ध केन्द्र होते. सातवाहन राजांची ती राजधानी होती. आता त्याचे फक्त अवशेष उरले आहेत. अमरावती येथे असलेला स्तूप अगदी सांचीच्या स्तुपासारखा, पण त्यापेक्षा थोडा मोठा आहे. येथील बौद्धलेणी प्रेक्षणीय आहेत. आंध्रमधील 2000 वर्षां पूर्वीचे कलावंत व कारागिर यांच्या कौशल्याचे दर्शन त्या शिल्पकृतींतून घडते.

नागार्जुनकोण्डा हे बौद्धांचे दुसरे प्रसिद्ध केन्द्र कृष्णेच्या दक्षिण तीरावर आहे. बौद्धधर्माची शिकवण देणारा थोर कवी नागार्जुन याचे नाव त्यास दिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच सरकारने तेथे कृष्णेवर धरण बांधायचे ठरवले. त्यासाठी खोदकाम सुरू झाले. तेव्हा तेथे एक प्राचीन शहर गाडले गेल्याचे दिसून आले. मग काम काही काळ थांबवण्यात आले आणि सरकारच्या पुरातत्त्व विभागाने या भागात उत्खनन सुरू केले. त्यावेळी इतिहासातील एका थोर संस्कृतीचे झगमगते पर्व येथील अवशेषांच्या रूपाने लोकांसमोर आले. तिसऱ्या शतकात या भागात असलेले मठ, स्तूप, शिलालेख आणि विद्यापीठ यांचे पुरावे येथे मिळाले. भूमिगत गटारव्यवस्थेचे अवशेष येथे मिळाले, तसेच खुल्या हवेत मृतांचा अन्त्यसंस्कार करण्याची पद्धत येथे होती, असेही समजून आले. स्नानासाठी बांधलेले घाटही आढळले. उत्खननात आढळलेल्या या सर्व वस्तू आता जवळच्या एका टेकडीवर वस्तुसंग्रहालय उभारून त्यात ठेवण्यात आल्या आहेत. त्या काळी श्रीलंका, जपान, चीन, तिबेट आणि सयाम येथून विद्यार्थी नागार्जुनकोण्डा विद्यापीठात अभ्यासासाठी येत, याचे पुरावे मिळाले आहेत. कृष्णाकाठी एके काळी अतिशय विकसित अशी संस्कृती नांदत होती, हे सिद्ध करणारा बराच ऐतिहासिक पुरावाही उपलब्ध झाला आहे. ह्युएन त्सांग या चिनी प्रवाशाने विजयवाडा, अमरावती आणि नागार्जुनकोण्डा यांना भेट देऊन त्यांच्याविषयी आपल्या प्रवासवर्णनात माहिती दिली आहे.


नागार्जुनकोण्डा या प्राचीन नगराच्या भूमीवर आता एक प्रचंड धरण कृष्णेला घातले जात आहे. त्यातून निर्माण झालेल्या विस्तीर्ण जलाशयास



अमरावतीच्या स्तूपाचे कोरीव काम

नागार्जुनसागर असे नाव देण्यात आले आहे. हे भारतील सर्वांत उंच व सर्वांत लांब धरण मानले जाते. येथील जल-विद्युत्-प्रकल्पातून जादा 12 लक्ष टन भाताचे आणि 50,000 टन साखरेचे उत्पादन होईल आणि 400 मेगावॉट वीज निर्माण होईल. या सर्वांपासून वार्षिक शंभर कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळेल.

विजयवाड्याहून पुढे 65 किलोमीटर्स गेल्यावर कृष्णेचे दोन भाग होतात आणि तिच्या दोन नद्या बनतात. त्यापैकी दक्षिण शाखा आणखी लहान लहान प्रवाहांत विभागली जाते व काही किलोमीटर्सनंतर मच्छलीपट्टम येथे समुद्राला मिळते. या त्रिभुज प्रदेशात दीवू नावाचे बेट तयार झाले आहे. पूर्वी नदीचे पाणी उपसून या बेटातील शेतीस द्यावे लागे, पण आता तेथेही एक लहानसे धरण बांधण्यात आले आहे. त्यामुळे शेतीसाठी नदीचे पाणी सरळ मिळू लागले आहे.



# तुंगभद्रा

तुंगभद्रा ही कृष्णेची उपनदी तर आहेच, पण स्वतंत्र नदी म्हणूनही तिचे महत्त्व आहे. स्वतंत्र नदी म्हणून तिच्या स्वत:च्या तीन मोठ्या उपनद्या आणि तीन लहान उपनद्या आहेत. तुंगा आणि भद्रा ह्या या गटातील दोन मोठ्या नद्या म्हैसूरमधील चिकमंगलूर जिल्ह्यात पश्चिम घाटातील 1200 मीटर उंचीच्या गंगामूल शिखरावर परस्परांजवळ उगम पावतात. आद्य शंकराचार्यांनी स्थापन केलेला मठ असणाऱ्या शृंगेरीवरून ईशान्येकडे तुंगा वाहात जाते. पुढे तीर्थ-हळ्ळीच्या रमणीय गुहांजवळून ती जाते. जंगलांतून, बांबूच्या वनांतून, घाटातील कॉफीच्या मळ्यांजवळून आणि डोंगरांच्या तुटलेल्या रांगांतील खोल दऱ्यांतून वाहात तुंगा पुढे भद्रा नदीला कुडली येथे मिळते. तेथून पुढे तिला तुंगभद्रा नाव मिळते. शरावती, कुमुद्वती आणि वरदा या तीन नद्या म्हैसूर राज्यात तुंगभद्रेला मिळतात. वेदवती आणि हांदरी या आणखी दोन नद्या

तिला आंध्रप्रदेशात मिळतात.

विजयनगरचे प्रसिद्ध साम्राज्य तुंगभद्रेच्या काठीच स्थापन झाले होते. या साम्राज्याच्या राजधानीचे नाव विजयनगरम होते. म्हैसूर राज्यातील सध्याच्या बेल्लारी जिल्ह्यात ते होते. त्या साम्राज्याचे अवशेष अजूनही त्या भागात पहायला मिळतात. विजयनगरच्या राजांनी त्यांच्या उत्कर्षकाळात चौदाव्या व पंधराव्या शतकात तुंगभद्रेवर अनेक दगडी धरणे बांधली. त्यातली 10 अजूनही लोकांच्या उपयोगी पडत आहेत.

स्वतंत्र नदी म्हणून तुंगभद्रा 645 किलोमीटर्सपर्यंत वाहते. म्हैसूर आणि आंध्रप्रदेशातील लोकांना तिचा अतिशय उपयोग होतो. रायलसीमा आणि रायचूर या सदा अवर्षण व दुष्काळ पडणाऱ्या जिल्ह्यांतून ती वाहाते. या


**विजयनगर मंदिराचे आत**





भागास पाणीपुरवठा व्हावा म्हणून तुंगभद्रा प्रकल्प आखण्यात आला. या प्रकल्पात तुंगभद्रेवर होस्पेटजवळ मल्लापुरम येथे धरण उभारण्याची योजना आहे. या धरणाचे दरवाजे भारतीय इंजिनिअरांनी पूर्णपणे तयार केले. त्यासाठी खास कारखाना उभारण्यात आला होता. धरणात साठलेले पाणी शेतीसाठी आणि जलविद्युत्-निर्मितीसाठी वापरले जाते. आंध्रप्रदेशातील इतर भागासही तुंगभद्रेचे पाणी शेतीसाठी पुरवले जाते. त्यासाठी कालवे काढून पाणी दूरपर्यंत खेळवलेले आहे. त्यांत कुडाप्पा-कर्नूल कालवा महत्त्वाचा आहे. तुंगभद्रेतून निघून तो कृष्णेला मिळतो.

तुंगभद्रेचे पाणी फार गोड मानले जाते. त्यामुळे 'स्नान गंगेचे आणि पान तुंगेचे' (गंगास्नानम तुंगा आनम) अशी म्हणच त्या भागात पडली आहे.



# नर्मदा

नर्मदा नदी खरे म्हणजे मध्य भारतात आहे. मध्य भारताच्या पूर्व भागात ती उगम पावते आणि महाराष्ट्र व गुजरात यांच्या सीमेवरून मध्यप्रदेशातून वाहात जाते. पण दक्षिण आणि उत्तर भारत यांना विभागणारी सीमारेषा म्हणून ती सामान्यतः ओळखली जाते. भौगोलिक दृष्टचा ती उत्तर भारतापेक्षा भारताच्या द्वीपकल्पीय भागात मोडते. मध्य भागात उगम पावून पश्चिमेकडे वाहात जाणाऱ्या दोन मोठ्या नद्यांपैकी नर्मदा एक आहे. (दुसरी नदी आहे तापी), हर्षवर्धनाच्या साम्राज्याची ती दक्षिणसीमा होती, तर चालुक्यांच्या राज्याची ती उत्तरसीमा होती. महाभारतात असलेल्या उल्लेखांवरून प्राचीन अवन्ती राज्याची नर्मदा ही दक्षिणसीमा होती असे दिसते.


मध्य भारतातील मैकल पर्वतराजीतील अमरकंटक डोंगरात नर्मदा उगम पावते. माणसाला अद्याप नियंत्रित करता न आलेली ही एक नदी आहे. तिच्यावर कुठेही धरण नाही वा तिचा कशासाठीही उपयोग करून घेण्यात आलेला नाही. उंच उंच पर्वतराजींतून, घनदाट जंगलांतून व अरुंद दऱ्यांतून ती वाहात जाते. दऱ्याखोऱ्यांतून ती उड्या घेत जाताना वाटेत अनेक धबधबे तयार होतात. कुठे तिचे निळेभोर पाणी पांढरेशुभ्र संगमरवरी खडक फोडून वाहात जाते, तर कुठे प्रचंड लालपिवळ्या कुरुंदाच्या टेकट्यांतून ते पुढे धावते. काही ठिकाणी कोळशाच्या प्रचंड थरांतून नर्मदा वाहात जाते. 1312 किलो-

मीटर्स प्रवास केल्यावर स्वैरपणे वाहात जाणारी ही नदी गुजरातमधील भडोचजवळ खंबायतच्या आखातात स्वतःला झोकून देते.

कपिलधारा येथे 25 मीटर्स उंचीच्या कड्यावरून नर्मदा खाली कोसळते तेव्हा तेथे प्रेक्षणीय धबधबा तयार होतो. डोंगराळ मांडला भागातून अवखळपणे वाहात जबलपूरजवळ धुवांधार येथे नर्मदा पुन्हा एकदा डोंगरावरून खाली उडी घेते. त्यानंतर मात्र या उड्या मारण्याने व कोसळल्याने जणु दमून संगमरवरी पर्वतराजीतून ती पाच किलोमीटर्सपर्यंत संथपणे वाहात जाते. मग विंध्य आणि सातपुडा या पर्वतांच्या मध्ये असलेल्या खोऱ्यातून ती 320 किलोमीटर्स वाहात जाते. जबलपूर आणि हांडिया यांच्या दक्षिणेस असलेले हे खोरे या नदीने वाहून आणलेल्या गाळामुळे सुपीक बनले आहे. यानंतर आणखी डोंगराळ व घनदाट जंगलांच्या भागातून नर्मदा जाते. हा भाग म्हणजे एके काळी दरोडेखोरांचे आणि पेंढाऱ्यांचे लपण्याचे ठिकाण होते. शेवटी नर्मदा गुजरातच्या सखल प्रदेशात उतरते. येथे तिच्यातून होड्या चालवता येतील, इतकी ती खोल बनली आहे.

आपल्या पुराणांमध्ये बहुतेक सर्व नद्यांचे उगम दैवी मानण्यात आलेले आहेत. नर्मदाही तिच्या दैवी उगमामुळे पवित्र मानली गेली आहे. त्यामुळे दरवर्षी भाविक मंडळी नर्मदाप्रदक्षिणा करतात, भडोच येथे तिच्या मुखापाशी ते प्रारंभ करतात आणि काठाकाठाने अमरकंटकपर्यंत जातात. मग तेथे उगमाची पूजा करून दुसऱ्या काठाने ते तिच्या मुखापर्यंत परत येतात. बहुतेक भारतीय नद्यांच्या काठी असतात त्याचप्रमाणे नर्मदेच्या तीरावरही पराघाट, ओंकार, पर्वणी, कर्नाली, शुक्लतीर्थम आणि खुद्द भडोच ही तीर्थक्षेत्रे आहेत. ओंकारनाथाचे प्रसिद्ध मंदिर असलेले मांधाता हे नर्मदेतील बेटावरील गाव, एका प्राचीन साम्राज्याची राजधानी असणारे आणि अनेक मंदिरे व प्रासाद असणारे महेश्वर, शुक्लतीर्थाजवळ नर्मदेत असणारे एक लहानसे बेट

ही आणखी काही उल्लेखनीय तीर्थे. शुक्लतीर्थाजिवळच्या या बेटात संत कबीर बैरागी होऊन वडाच्या झाडाखाली राहिला होता, असे सांगतात. त्या झाडास अजूनही कबीर म्हटले जाते.



नर्मदेच्या महत्त्वाच्या उपनद्यांत मांधाता येथे तिला मिळणारी बंजर, नरसिंगपूर येथे मिळणाऱ्या शेर आणि शक्कर; आणि हुशंगाबाद येथे मिळणाऱ्या थावा, कांजल व छोटाथावा यांचा समावेश होतो. उत्तरेकडून फक्त हिरन ही एकच नदी नर्मदेला जबलपूर येथे मिळते.

नर्मदेचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्या पात्राची रुंदी वाटेत सतत बदलत राहाते. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मुखापासून ४४ किलोमीटर्स आतपर्यंत तिच्यावर समुद्राच्या भरती-ओहोटीचा परिणाम होत राहतो. या कारणांमुळे आणि डोंगराळ प्रदेशातून तो वाहात असल्याने नर्मदेच्या पाण्याचा पूर्णपणे उपयोग करून घेता आलेला नाही. असे असूनही विकासासाठी फारसे प्रयत्न न करताही मुखापासून 100 किलोमीटर्सपर्यंत नर्मदेत नौकानयन चालते, आणि या अवखळ, माणसाळवता न आलेल्या नदीचे नाचरे पाणी 90,000 चौरस किलोमीटर्स जमीन भिजवते.

म. प्र. म. ठाणे. ग्रंथालय शाखा.
बा. क्र. १५५३९ नों. दि. २५।६।७५
वि. आ. वा. ।



## काही लहान नद्या

भारताच्या द्वीपकल्पीय भागातील नद्या दोन प्रकारच्या आहेत—'अन्तर्गत' आणि किनारी.किनारी प्रदेशातून वाहाणाऱ्या नद्या हे लहान लहान ओढे च आहेत. अशा नद्या सुमारे 600 आहेत. पश्चिम किनाऱ्यावर गुजरातमधील सौराष्ट्रापासून अगदी दक्षिण टोकाच्या कन्याकुमारीपर्यंत या नद्या वाहातात आणि अरबी समुद्राला मिळतात. त्रिभुज प्रदेशात असणारे काही प्रवाहही याच प्रकारात मोडतात. 'अंन्तर्गत' नद्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच आहेत. त्यापैकी कावेरी, गोदावरी आणि कृष्णा यासारख्या नद्या पश्चिम घाटात उगम पावून बंगालच्या उपसागराला जाऊन मिळतात. नर्मदा आणि तापीसारख्या नद्या मध्य भागात उगम पावून अरबी समुद्राकडे वाहात जातात. पश्चिमेकडे वाहाणाऱ्या नद्या बहुधा डोंगराळ प्रदेशातून वाहातात आणि त्यांच्या मुखापाशी त्रिभुज प्रदेश निर्माण झालेले नाहीत. याउलट पूर्वेकडे वाहाणाऱ्या नद्यांचे वैशिष्टय म्हणजे त्यांच्या मुखाशी मोठमोठे त्रिभुज प्रदेश निर्माण

झाले आहेत. भारताचा पूर्वकिनारी पट्टा या त्रिभुज प्रदेशांमुळे सुपीक झाला आहे.

## पेन्नार नद्या–उत्तर आणि दक्षिण

म्हैसूरमधील नंदीदुर्ग डोंगरात उगम पावलेल्या पेन्नार नदीच्या (हिला पिनाकिनी असेही म्हणतात) दोन शाखा आहेत. उत्तर पेन्नार 560 किलोमीटर्स लांब आहे. आंध्रप्रदेशातील कुडाप्पा, अनंतपूर आणि नेलोर जिल्ह्यातून वाहात जाऊन नेलोर शहराच्या दक्षिणेस ती बंगालच्या उपसागरास मिळते. दक्षिण पेन्नार 620 किलोमीटर्स लांब आहे. म्हैसूरमधील बंगलोर जिल्ह्यातून व नंतर तामिळनाडूमधील सालेम व दक्षिण अर्काट जिल्ह्यांतून वाहात जाऊन कडलोरच्या उत्तरेस ती बंगालच्या उपसागरास मिळते.

पेन्नार नदीचे वैशिष्ट्य म्हणजे तिला एकदम अकल्पितपणे पूर येतो. लहानसा शान्त प्रवाह एकाएकी घोंगावणारा महापूर बनतो. 'लोणी वितळण्याआधी पेन्नारला पूर येतो !' अशी म्हणच या भागात आहे. पेन्नारच्या कोणत्याही शाखेमध्ये वर्षातून फक्त दोन महिने पाणी असूनही हे घडते ! उत्तर पेन्नारवर 1885 साली नेलोरजवळ धरण बांधण्यात आले होते. सर आर्थर कॉटन यांनी त्यात पुढे सुधारणा केली. त्यानंतर या नदीपासून शेतीला पाणी पुरवण्यासाठी कालवे काढण्यात आले.

दक्षिण पेन्नार तामिळनाडूतून वाहाताना तिला अतिशय कमी पाणी आढळते याचे एक कारण, म्हैसूरमधील तिच्या 104 किलोमीटर्सच्या वाटेवर अनेक धरणे बांधण्यात आली आहेत, हे आहे. त्यामुळे तिचे फारच थोडे पाणी तामिळनाडूत पोचते. पण सुदैवाने तामिळनाडूत काही उपनद्या तिला मिळतात व पाटबंधाऱ्यांसाठी ती उपयुक्त ठरते.

## पालार

तामिळ भाषेत पालार म्हणजे दुधाची नदी. पण पालार नदी अगदी कोरडी नदी आहे. तिच्याविषयीची गंमत म्हणजे तिच्या पात्रात कुठेही खणले तरी स्वच्छ पाण्याचा झरा लागतो. म्हैसूरमध्ये ती उगम पावते व तामिळनाडूतून वाहात जाते. पण तिच्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग तामिळनाडूपेक्षा म्हैसूरने केला आहे. आंबा, नारळ आणि काजू यांची लागवड तिच्या तीरांवर करण्यात आली आहे.

पालारने ऐतिहासिक कामगिरीही बजावली आहे. बोम्मी रेड्डी आणि थिम्मा रेड्डी या दोघा रेड्डी नायकांनी वेल्लोरला सोळाव्या शतकात बांधलेल्या किल्ल्याच्या खंदकात पालारचे पाणी भरण्यात आले होते. चतुरंगपट्टण येथे पालार समुद्राला मिळते. डचांची कारकीर्द तिने तेथे पाहिली. हे लहानसे गाव तेव्हा मलमलीच्या उद्योगासाठी प्रसिद्ध होते. हल्ली ते मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे.

## शरावती

पश्चिम घाटातील उंच पठारावर शरावती नदी उगम पावते. सुप्रसिद्ध जोग धबधबा याच नदीवर आहे. उंच कड्यावरून चार टप्प्यांवर उड्या घेत शेवटच्या कड्यावरून 253 मीटर्स खाली ती कोसळते. हा शेवटचा टप्पा म्हणजेच जोग किंवा गिरसप्पा धबधबा. भारतातील अतिशय रम्य जलप्रपातांत त्याची गणना होते. कड्यावरून त्याचे चार प्रवाह खाली कोसळतात त्यांची नावे राजा, रोअरर, रॉकेट आणि राणी अशी आहेत. सुट्टीमध्ये येथे भेट देणाऱ्यांसाठी विश्रामगृहे व अतिथिगृहे बांधण्यात आली आहेत. धबधब्याचे सौंदर्य न्याहाळीत हौशी प्रवासी तासन् तास तेथील व्हरांड्यात किंवा हिरवळीवर बसलेले दिसतात. धबधबा जेथून कोसळतो, तेथे अगदी जवळ

उभे राहून त्याचे स्फटिकासारखे निर्मळ पाणी खाली कोसळताना व कड्याच्या निम्म्या उंचीपर्यंत त्याचे तुषार वर उसळताना पाहण्याचा आनंद येथे लुटता येतो.


## केरळातील नद्या

भारतीय संघराज्यातील केरळ हे अगदी दक्षिण टोकाचे राज्य. या लहानशा राज्यात 40 हून अधिक नद्या, उपनद्या व त्यांच्या शाखा आहेत. जलमार्गांचे जाळेच या राज्यात पसरले आहे. मात्र त्यातल्या बहुतेक ओढ्यासारख्याच आहेत, आणि काही तर खरे म्हणजे फक्त पावसाळ्यातच वाहात असतात. भरतपुझा आणि पेरियार या येथील दोन सर्वात मोठ्या नद्या.

पश्चिम घाटात शिवगिरी डोंगरांतील घनदाट जंगलात पेरियार उगम पावते. ती 225 किलोमीटर्स लांब असून कोचीनच्या उत्तरेस अरबी समुद्राला मिळते. मुखापासून 160 किलोमीटरपर्यंत ती नौकानयनास उपयुक्त आहे. तिरूवंकुर पर्वतात तिच्यावर धरण बांधण्यात आलेले असून डोंगरात बोगदा खणून तिचे पाणी पूर्वेकडे वळवण्यात आले आहे. हा बोगदा 1766 मीटर्स लांब आहे. 1895 साली तो बांधण्यात आला. त्या काळाच्या मानाने तो इंजिनिअरिंगचा चमत्कारच होता. या बोगद्यातून निघून पेरियार तामिळनाडूमधील मदुराई जिल्ह्यातून वाहात जाते. तेथे ती वैगई नदीला मिळते. आणि मदुराई जिल्ह्यातील जमीन समृद्ध करण्यास हातभार लावते. हा बोगदा बांधला जाण्यापूर्वी पेरियारचे बहुतेक पाणी वायाच जात असे.

पेरियारवर तिरुवंकुर डोंगराजवळ बांधलेल्या धरणाने निर्माण झालेल्या जलाशयाकाठी पेरियार अभयारण्य आहे. भारतातील नामवंत अभयारण्यांत

केरळातील संथ पाणी







पेरियार अभयारण्य

त्याची गणना होते. देशातलेच काय, पण जगभरचे हौशी प्रवासी व पाहुणे येथील वन्य श्वापदे पाहाण्यासाठी येतात. मोटरबोटीतून प्रवास करीत त्यांना सरोवरात स्नान करायला वा पाणी प्यायला येणारे हत्तींचे कळप, रानरेडे, वाघ, अस्वले इत्यादी प्राणी पाहाता येतात. या भागातील वन्य पशूंना नैसर्गिकपणे जीवन जगता यावे अशा दृष्टीने येथील निसर्गाचे जतन करण्यात आले आहे.




केरळात पम्पा नावाची आणखी एक नदी आहे. कोलम जिल्ह्यातील डोंगरातून वाहाणारे अनेक ओढे एकत्र येऊन ही नदी बनते. ती फक्त 144 किलोमीटर्स लांब आहे. केरळाचे भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुट्टनाडची शेती पम्पा नदीकडूनच भिजवली जाते. दरवर्षी ओनम सणाच्या वेळी या नदीतून नावांच्या शर्यती होतात. त्यासाठीही ही नदी प्रसिद्ध आहे. या शर्यतीत भाग घेणाऱ्या एकेका चिंचोळ्या होडीत शंभराहून अधिक माणसे मावतात. वल्ह्यांऐवजी होडी चालवण्यासाठी पायदट्ट्यांचा उपयोग केला जातो. नदीकाठी राहणारे सगळे लोक या शर्यतीत भाग घेतात. केरळचे जीवन आणि परम्परा यांचे सुंदर दर्शन या नौका-स्पर्धेत घडते.

## तामिळनाडूतील तीन नद्या

तामिळनाडूतील मदुराई हे दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. पाण्डय राजांची ती एकेकाळी राजधानी होती. तामिळ संस्कृती व साहित्य यांचे ते अनेक शतकांपासून केन्द्र आहे. चार विशाल गोपुरे असणारे सुप्रसिद्ध मीनाक्षीमंदिर येथेच आहे. या शहरातून वैगई ही छोटीशी – केवळ 260 किलोमीटर्स लांबीची– नदी वाहते. पश्चिम घाटातील वेलचीच्या टेकड्यांजवळील वर्षा खोऱ्यात ती उगम पावते आणि पाल्कच्या सामुद्रधुनीला मिळते. पावसाळ्यात या नदीला पूर असतो, तर वर्षाचे शेवटचे तीन महिने ती कोरडी पडते. केरळातील पेरियार नदी तिला मिळते त्यामुळे तामिळनाडूतील लोकांना तिचा थोडाफार उपयोग होतो.

इलांगो या कवीने 'सिलप्प धिकारम' या विख्यात तामिळ काव्यात वैगईच्या वाहत्या पाण्याचे काव्यमय वर्णन केले आहे. वैगईची त्याने तरुण स्त्रीशी तुलना केली आहे. नदीच्या पात्रात मधोमध रेताड जमिनीत उमललेली लाल फुले जणू तिचे ओठ, पाण्यात तरंगणारी मोगऱ्याची शुभ्र पुष्पे म्हणजे




मीनाक्षी मंदिर

तिचे डोळे, तिचा काळाभोर वाळूचा काठ म्हणजे तिचा केशसंभार... असे मोठे सुरेख वर्णन केले आहे त्याने. प्राचीन काळी वैगईवर संचार करणाऱ्या नौका मोठ्या कलाकुसरीने तयार केलेल्या असत. घोडा, हत्ती वा उंट यांची डोकी त्यांच्या अग्रभागी कोरलेली असत.

तामिळनाडूत एका काळी शैव आणि जैन यांच्यात परस्परांवर श्रेष्ठत्व मिळवण्यासाठी मोठा वाद माजला होता. त्यावेळी एक धर्म दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ ठरवण्यासाठी वैगईच्या पाण्याचा उपयोग करण्यात आला. प्रत्येक पक्षाने आपल्या धर्माची वचने ताडाच्या पानांवर लिहून ती नदीत फेकली. जी पाने प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वर वाहात गेली तो धर्म श्रेष्ठ, असे ठरले होते. कल्पना छान आहे की नाही ?

तामिळनाडूत एक नदी अशी आहे की, ती फक्त एका जिल्ह्यातच वाहाते,




इतकी लहान आहे. तिचे नाव ताम्रपर्णी. पश्चिम घाटातील पोधिगाई डोंगरात 1838 मीटर्स उंचीवर ती उगम पावले. ताम्रपर्णीची लांबी फक्त 120 किलोमीटर्स



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र ९५५३९ नों दि २५।६।०४
वि. बा.वा.

आहे. त्यापैकी 24 किलोमीटर्स ती डोंगरउतारावरून वाहात जाते. नदीच्या वाकीच्या भागाचा पाटबंधाऱ्यासाठी भरपूर उपयोग करून घेण्यात आला आहे. ज्या तिरूनेलवेली जिल्ह्यातून ही नदी वाहते तो अतिशय सुपीक आणि समृद्ध आहे. या नदीच्या पाण्यात तांबे (संस्कृत ताम्र) असल्याने तिला ताम्रपर्णी नाव पडले, असे म्हणतात.

या नदीचा उगम ज्या डोंगरात होतो, त्याची तामिळ काव्यात मोठीच प्रशस्ती केलेली आढळते. चन्द्रकोरीचा मुकुट मस्तकी धारण केलेला पर्वत किंवा दक्षिण वारा ज्याच्यावर नृत्य करतो असा पर्वत, असे त्याचे वर्णन करतात. पूर्व आणि पश्चिम असे दोन्ही मान्सून वारे या पर्वतराजीवर आदळतात, त्यामुळे वर्षातून अनेक महिने ही गिरीशिखरे ढगांनी आच्छादलेलीच असतात. हिवाळ्यात किंवा शिशिर ऋतूत हा भाग विलक्षण देखणा बनतो. त्या काळात येथे सुटी घालवणे आनंदाचे ठरते. पोधिगाई पर्वतावरून ताम्रपर्णी खाली उतरताना वाटेत अनेक धवधबे तयार होतात. त्यातला सर्वात मोठा धवधवा 90 मीटर्स उंच आहे. कल्याणतीर्थम येथे तो आहे.



IRBK-0115539





